पोलीस स्टेशन कळंब जि.यवतमाळ

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District** (जिल्हा): यवतमाळ **P.S.**(ठाणे): कळंब **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0568 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 26/07/2022 01:44 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

**1. Day**(दिवस): सोमवार **Date From** (दिनांक पासून): 25/07/2022

**Time Period** (कालावधी): पहर 6 **Date To** ( दिनांक पर्यंत): 25/07/2022

**Time From** (वेळेपासून): 16:59 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 17:09 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 26/07/2022 **Time** (वेळ): 01:23 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 002 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 26/07/2022 01:23 बजे

**4. Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

**5. Place of Occurrence** (घटनास्थळ):

**1.(a) Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address** (पत्ता): उजवेकडील लोखंडी गेट जवळ,पंचायत समिती कार्यालय कळंब, कळंब,कळंब

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): अक्षय विठ्ठलराव गायकवाड

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचां क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रासा रोड,शहाब नगर,कळंब,कळंब,कळंब ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रासा रोड,शहाब नगर,कळंब,कळंब,कळंब ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-7775837748

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमोद शिवाजी बागडे | | | 1. बोरगाव,मोहाडी,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

श्री अक्षय विठ्ठलराव गायकवाड वय 29 वर्ष धंदा कृषी केंद्र रा शहाब नगर रासा रोड कळंब ता कळंब जिल्हा यवतमाळ मी वर नमुद पत्यावर माझे कुटूबासह राहतो मला श्री प्रमोद बागडे कृषी अधिकारी पंचायत समिती कळंब यांनी मला कपाशी बियाण्यांचा नमुना पास करण्याकरीता 15000 हजार रुपये लाचेची मागणी केल्याने व मला त्यांना लाच रक्कम द्यावयाची नसल्याने मी त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार देणेकरीता दिनांक 25/07/2022 रोजी न्टी करप्प्न ब्युरो यवतमाळ येथे आलो व माझी लेखी तक्रार दिली मी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे,प्रती,मा पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतीबंधक विभाग यवतमाळ, अर्जदार -श्री अक्षय विठ्ठलराव गायकवाड वय 29 वर्ष धंदा कृषी केंद्र रा शहाब नगर रासा रोड कळंब जिल्हा यवतमाळ मोबाईल क्रमांक 7775837748,महोदय,वरील विषयान्वये लेखी अर्ज सादर करतो कीए मी वरील पत्यावर राहत असुन माझे शिक्षण ग्री डिप्लोमा व एमबीऐ पर्यंत झालेले आहे. मला मराठी व हिंदी भाषा लिहीता वाचता येते. मी कळंब तालुका कृषी विक्रेता संघाचा अध्यक्ष आहे. माझे कळंब येथे स्वतःचे सन 2018 पासुन मातोश्री कृषी केंद्र असुन ते मी चालवत आहे. दिनांक 24/05/2022 मध्ये मी अन्नाजी कृषी केंद्र कळंब यांना विकलेले कपाशी बियाण्याचा नमुना पंचायत समिती कळंब येथील कृषी अधिकारी श्री. प्रमोद बागडे यांनी तपासणी करीता घेतला व श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांनी मला फोन केला व मला म्हटले की तुम्ही अन्नाजी कृषी केंद्र कळंब येथे विकलेले कपाशी बियाण्याचा नमुना आम्ही तपासला असता सदरचा नमुना हा फेल ठरला असुन सदरचा नमुना पास करण्या करीता तुम्ही मला 15000/- रुपये दया तेव्हा मी तुमचा कपाशी बियाण्याचा नमुना पास करेल असे म्हटले व फोन बंद केलाण्यानंतर दिनांक 21/07/2022 रोजी श्री.प्रमोद बागडे,कृषी अधिकारी हे माझे मातोश्री कृषी केंद्र या दुकानात आले व मला पुन्हा लाचेची मागणी केली असता मी त्यांना नाईलजास्तव हो म्हटले व माझेकडे पैसे नाही असे सांगितले. तरी पंचायत समिती कळंब येथील श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी हे मला कपाशी बियाण्याचा नमुना पास करण्याकरीता 15000/- रुपये लाचेची मागणी करीत आहे. माझी त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ येथे त्यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार देण्याकरीता आलो आहे, श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांचेशी माझे कोणतेही वैर नसुन देण्या घेण्याचा उसणवारीचा अथवा शासकीय पैसे जमा करण्याचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी संबधीत श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी पंचायत समिती, कळंब यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. ठिकाण . यवतमाळ दिनांक . 25/07/2022 , स्वा/- दिनांक 25/07/2022 रोजी वरीलप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक विनायक कारेगावकर यांनी मा. राज्यकर उपायुक्त, वस्तू व सेवाकर कार्यालय यवतमाळ येथुन पंच क्र.1) श्री. संकेत संजय शिवरामवार, राज्यकर निरीक्षक व पंच क्र2)श्री. ललित रामकृष्ण ढाले, कर सहायक असे दोन शासकीय पंच बोलाविले. यानंतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी दोन्ही पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली व लेखी तक्रार वाचण्यास देण्यात आली. माझी तोंडी तक्रार व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी मला सांगितले की, लोकसेवक

यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी, यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. व माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 25/07/2022 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर, पंच व स्टाफसह कळंब शहराबाहेरील यवतमाळ ते नागपुर रोडवरील उड्डाण पुलाचे खाली चाय पॉईंट येथे आलो. पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये 32 जी.बी. मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले. तसेच व्हॉईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करुन दाखविण्यात आले. त्यानंतर पडताळणी करणेकरीता हजर असल्याबाबतचा पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी स्वतःचा माझा तसेच दोन्ही पंच यांचा आवाज व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमृद्रीत केला. यानंतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी मला लोकसेवक श्री.प्रमोद बागडे,कृषी अधिकारी यांची भेट घेणेकरीता व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात लेसव्दारे लटकवु शर्टाचे आतमध्ये ठेवला, ती वेळ 15:44 वाजताची होती. मला व पंच क 1) श्री.शिवरामवार यांना सुचना देऊन लोकसेवक श्री.प्रमोद बागडे,कृषी अधिकारी यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालय कळंब येथे माझेकडील चारचाकी वाहनाने रवाना केले. मी आणि पंच क्रमांक 1) श्री.शिवरामवार यांचेसह पंचायत समिती कार्यालय कळंबचे आत गेलो. पंच क्र.1) श्री.शिवरामवार हे श्री.बागडे,कृषी अधिकारी यांचे कबीनचे बाहेर दरवाज्याजवळ थांबुन होते. मी त्यांचे कबीनमध्ये श्री.बागडे,कृषी अधिकारी यांची भेट घेतली व चर्चा केली. चर्चे दरम्यान श्री.बागडे,कृषी अधिकारी यांनी मला मी अन्नाजी कृषी केंद्र कळंब यांना विकलेल्या कपाशी बियाण्याचा नमुना पास करण्याकरीता तडजोडीअंती 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व स्विकारण्याचे मान्य केले, त्यानंतर मी व पंच क्र.1) श्री.शिवरामवार असे कळंब शहराबाहेर थांबुन असलेल्या पडताळणी पथकाजवळ परत आलो असता पोलीस निरीक्षक श्री. कारेगावकर यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर स्वतःजवळ घेउन बंद केला, ती वेळ 16:00 वाजताची होती. यानंतर मी सविस्तर हकीकत पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांना सांगितली. त्याच प्रमाणे पंच क्रमांक 1) श्री.शिवरामवार यांनी मी सांगितलेल्या हकीकतेप्रमाणेच हकीकत सांगितलीण् व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट लपटॉपचे सहायाने सर्वासमक्ष स्पीकर लावुन ऐकुन घेतले. त्यानंतर माझे विनंतीवरुन सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याचे ठरले. मी सापळा कार्यवाहीकरीता लागणारी माझे जवळील 10,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध करुन दिली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. कारेगावकर यांनी सांगितल्यावरुन पो.ना.वसिम शेख यांनी मला व पंचाना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन व अल्ट्राव्हालेट दिव्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले, यानंतर सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे पन्ट समोरील उजवे बाजुचे खिश्यात लाचेची रक्कम ठेवण्यात आली, यानंतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. लोकसेवक श्री.प्रमोद बागडे,कृषी अधिकारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास स्वतःचा डावा हाता डोक्यावर वारंवार फिरवीण्याचा ईशारा सांगीतला. यावेळी सापळा कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले, पोलीस निरीक्षक श्री. कारेगावकर यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये 32 जी.बी.मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले, यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी कळंब शहराबाहेरुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात लटकवुन शर्टाचे आत ठेवला ती वेळ 16:59 वा. वाजताची होती. यानंतर मी आणि पंच क्र.1) शिवरामवार यांचेसह पंचायत समिती कार्यालय कळंबकडे रवाना झालो. पंचायत समिती कार्यालयाचे परिसरात सापळा लावण्यात आला. मी श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांचेशी पंचायत समिती कार्यालयामधील त्यांचे कबीनमध्ये चर्चा केली, व चर्चाकरत पंचायत समिती कार्यालय कळंबचे उजवीकडील लोखंडी गेटजवळ येउन चर्चे दरम्यान श्री. प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांनी माझे जवळील 10,000/- रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली. मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा केला. श्री. प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले. पोलीस निरीक्षक श्री. कारेगावकर यांनी माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर स्वतःचे ताब्यात घेऊन बंद केला, ती वेळ 17:09 वा होती. श्री.प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांचे हात, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हॉईलेट दिव्यांचे प्रकाशात तपासण्यात आले. तसेच लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. यानंतर मी सविस्तर हकीकत पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. कारेगांवकर यांना सांगितली. त्याच प्रमाणे पंच क्रमांक 1) श्री. शिवरामवार यांनी मी सांगितलेल्या हकीकतेप्रमाणेच हकीकत सांगितली. सविस्तर कार्यवाही दिनांक 25/07/2022 रोजी चे पडताळणी पुर्व, पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली. तरी आरोपी लोकसेवक प्रमोद शिवाजी बागडे, वय 55 वर्ष, पद कृषी अधिकारी (सामान्य) नेमणुक पंचायत समिती कळंब ता कळंब जिल्हा यवतमाळ (वर्ग.2) यांनी स्वतःकरीता दिनांक 25/07/2022 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान मला अन्नाजी कृषी केंद्र कळंब यांना विकलेल्या कपाशी बियाण्याचा नमुना पास करण्याकरीता तडजोडीअंती 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून दिनांक 25/07/2022 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक प्रमोद बागडे, कृषी अधिकारी यांनी माझेकडुन 10,000/- रुपये लाच रक्कम पंचायत समिती कार्यालय कळंबचे उजवीकडील लोखंडी गेटजवळ पंचासमक्ष स्विकारली, त्यावरुन आरोपी लोकसेवक प्रमोद शिवाजी बागडे, कृषी अधिकारी यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): AJIT T. RATHOD(I (Inspector)) / PBMH88983 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): AJIT T. RATHOD
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PBMH88983

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन कळंब

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**